RESEARCH FRONT

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# भारतातील शेतमजूर समस्या, कारणे, उपाययोजना

**प्रा. राजू नबी संदे,** आदर्श महाविद्यालय वीटा

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान अर्थव्यवस्था असून शेतीला भारतीय अर्थव्यवस्थेत महत्वाचे स्थान आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून शेतीला ओळखले जाते भारताचे वर्णन नेहमी सुजलाम सुफलाम असे केले जाते म्हणजेच नैसर्गिक साधन संपत्तीच्या बाबत भारत परिपूर्ण आहे.

शेती हा भारतीयांचा आत्मा आहे असे म्हटले जाते. भारतामध्ये बहुसंख्य लोक उपजिविकेसाठी शेतीवर अवलंबून आहेत. सध्या भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी जवळजवळ 65 टक्के लोकसंख्या उपजिविकेसाठी शेतीवर अवलंबून आहे. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचे फार मोठे योगदान आहे. थोडक्यात भारतीय अर्थव्यवस्थेची संपूर्ण मधार शेतीवर आहे म्हणूनच भारतीय शेतीला अर्थव्यवस्थेचा कणा असे म्हंटले जाते.

शेती हा भारतातील सर्वात जुना आणि परंपरागत व्यवसाय आहे. कोणत्याही देशात शेती ही मानवी जीवनाची पोशक असते. उद्योगाची जननी असते. भारतीय अर्थव्यवस्थेत पूर्वी पासूनच परंपरागत शेती कसली जाते अलिकडच्या काळात आधुनिक मंत्र व तंत्राच्या साहाय्याने शेती करण्याकडे शेतक–यांचा कल वाढलेला दिसतो. पूर्वी उत्तम शेती, मध्यम व्यापार, आणि कनिष्ठ नोकरी अशी एक म्हण होती. परंतु अलिकडे भारतीय शेतक–यांसमोर अनेक समस्या उभ्या आहेत त्यामध्ये शेतकरी आडकला आहे. म्हणून आज असे म्हटले जाते की उत्तम नोकरी मध्यम व्यापार, आणि कनिष्ठ शेती असे उलटे झाले आहे.

आधुनिक पध्दतीने शेती कसण्यासाठी पेरणीपूर्व अवस्थेपासून पेरणी ते पीक अन्नधान्य घरात येईपर्यंत शेतक–याला शेतमजूरांची आवश्यकता असते वेळच्यावेळी शेत मजुर मिळाले तर शेतक–याच्या शेती उत्पन्नात वाढ होते. याउलट नुकसान होते.

सुरूवातीपासून असे म्हटले जाते की शेती हंगामाच्या काळात शेत मजूरांना रोजगार मिळतो. हंगाम संपल्यानंतर शेत मजूर बेकार होतात. मात्र अलिकडे नेमकी याच्या विरूध्द परिस्थिती आढळून येते. भारतीय शेतक–यापुढे नैसर्गिक समस्या आहेतच परंतु अनैसर्गिक समस्या ज्या आहेत त्यात शेत मजूराची समस्या अक्षरशः शेतक–याची जीवघेणी ठरत आहेत. ही समस्या शेतकरी शेती, शेती उत्पादन, उत्पन्न, समाज, ग्राहक, शासन, अर्थव्यवस्था, राजकारण यावर परिणाम करते. त्यासाठी शेतक–याने यंत्राची व तंत्राची मदत घेतली मात्र शेतीच्या इतर कामासाठी शेत मजूरांची नितांत आवश्यकता असते. यंत्राच्या साहय्याने शेतीची सर्वच कामे होत नसतात तसेच भारतातील सर्वच शेतकरी आर्थिक दृष्टया प्रबळ नाहीत म्हणून त्यांना यंत्रे वापरणे शक्य नाहीत. तर शतीमध्ये श्रमप्रधान तंत्राचा वापर करणे आवश्यक अपरिहार्य आहे. भारतात शेत मजुराच्या समस्या सोडवण्यासाठी शेतमजुर आणि शेतकरी या दोन्ही घटकांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. कारण भारतातील शेती आणि शेतमजुर एकमेकांना पुरक आहेत.

**शेतमजुराची व्याख्या**

शेतमजुराची व्याख्या करणे कठीण आहे परंतु काही चौकशी समित्या व तज्ञांनी व्याख्या केल्या आहेत. त्यातील दोन व्याख्या पुढीलप्रमाणे.

1. 1956 – 57 – दुसरी शेतमजुर चौकशी समिती शेतीमध्ये काम करणारे तर शेतमजूर असतातच, शिवाय दुग्धव्यवसाय, पशुपालन, कुक्कुटपालन इ. पूरक व्यवसायातील लोकसुध्दा शेतमजुरांच्या गटात येतात. 'शेतमजूर कुटुंबाच्या कल्पनेत बदल करताना या समितीने असे प्रतिपादन केले की ज्या कुटुंबाच्या उत्पन्नाचे मुख्य साधन शेती मधील कामाची मजुरी हे आहे त्याला 'शेतमजूर कुटुंब' म्हणावे.
2. राष्ट्रीय श्रम आयोगाच्या मते ज्या व्यक्ती अकुशल आणि असंघटित असुन उपजिविकेसाठी ज्यांच्याजवळ श्रम हेच साधन आहे. त्यांना शेतमजूर म्हणता येईल या व्याख्येनुसार भुमीहीन शेतमजूर आणि वर्षातील काही काळ दुस–याच्या शेतात काम करणारे सीमांत आणि अल्प भूधारक यांचाही समावेश 'शेतमजूर' या संज्ञेत होतो.
   1. वरील व्याख्यावरून असे म्हणता येते की, ज्या व्यक्तीजवळ थोडी सुध्दा जमीन नसते त्याच्याजवळ उपजिविकेचे साधन म्हणजे त्यांचे श्रम आहे. त्यांना भूमीहीन शेत मजूर असे म्हणता येईल.
   2. ज्यांच्याजवळ थोडी जमीन आहे परंतु उपजिविकेसाठी अगदी अपुरी असल्यामुळे त्यांना इतरांच्या शेतावर काम करणे भाग पडते अशा मजूरांना आपण अल्प भूमीधारी शेत मजुर म्हणु शकतो.

**भारतातील शेतमजूर समस्येचे स्वरूप –**

1970 पर्यंत शेतक–यांना शेतमजूर परवडणारे असे होते. त्या काळात औद्योगिकरण कमी प्रमाणात असल्याने शेत मजुरांना पुरवठा मुबलक होता. मात्र जशी रोजगार हमी योजना सुरू झाली तेंव्हा पासून

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

शेतमजूरांनी शेतीकडे पाट फिरवली. वेगळया राज्यातील औद्योगिक विकास महामंडळ सुरू झाल्याने भारतातील शेतमजूर अशा कारखान्यात स्थलांतरीत झाला.

भारतात आधुनिकीकरण शहरीकरण वाढण्यास सुरूवात झाली तेंव्हा पासून भारतातील तरूण वर्ग शेतीतील कष्टाचे काम सोडून कमी पगाराच्या पण शहरातील झगमगाटीने शहरात स्थलांतरीत झाला तेंव्हा पासून शेतक—यांना शेतमजूरांची समस्या जाणवू लागली. अलीकडे वाढते आधुनिकिकरणामुळे शहरीकरणांमुळे खेडी आणि शहर यातील अंतर कमी झाले आज खेडयातील शेतमजूर डबा घेउुन शेती ऐवजी शहरात जावू लागला जे थोडे मजूर शिल्लक राहिले ते हुकमी झाले शेत मालक बनु लागले मजुरीतून मिळणारे पैसे व अन्नधान्य मोठया प्रमाणात कमावून ते सधन बनले. तर कर्ज काढून कर्जाचे व्याज भरताना वाढती मजूरी देताना शेतकरी मात्र मंजूर झाला आज पश्चिम महाराष्ट्रात तर अनेक शेत मजूर शेतक—याला कर्ज देत असल्याचे दिसून येते ब—याच मोठया शेतक—याची शेत जमीन अशा शेत मजूरांकडे गहाण तारण असल्याचे दिसून येते.

**भारतातील शेतमजूरांच्या समस्येची कारणे —**

भारतातील अर्थव्यवस्थेत सर्वच भागात बेरोजगारी वाढत असल्याचे चित्र दिसत असले तरी प्रत्यक्षात मात्र शेतात शेत मजूर मिळेणासे झाले आहेत. एका पाहणीनुसार भारतातील कारखान्यात आणि शेतात कामगारांची उपस्थिती 40 टक्क्यांनी घटल्याचे आढळून आले आहे. सरकारकडून गोरगरिबांना मोफत व अल्पदरात धान्य वाटप योजनांचा हा परिणाम मानला जातो. परंतु हे एकच कारण नाही तर पुढील अनेस कारणामुळे भारतीय शेतीला शेत मजुरांचा तुटवडा जाणवतो.

**1 शेत मजुरीत वाढ :—**

भारतीय अर्थव्यवस्थेत शेतमजुरांना मिळणारी मजुरी वाढ झाली असल्याने शेतमजुर पूर्वीपेक्षा कमी दिवस काम करून इतर दिवसांचा उदरनिर्वाह चालवू शकतात त्यामुळे शेतमजुरांची शेतात काम करण्याची प्रवृत्ती कमी झाली आहे. त्यामुळे शेत मजुर काम उपलब्ध असतानाही काम करत नाहीत. त्यामुळे शेती व्यवसायसाठी शेतमजूर मिळेणासा झाला आहे.

**2. आळशिवृत्ती :—**

आजचा शेतमजूर खूपच आळशी बनला आहे त्यामुळे त्याची कार्यक्षमता कमी झाली आहे. शेतातील कष्टाचे काम व ओझ्याचे काम करण्यास शेतमजूर तयार नसतो. त्यातच त्याच्या घरातील एकापेक्षा जास्त लोक मजुरी करत असल्याने त्याच्याकडे मोठया स्वरूपात उत्पन्न येत असल्याने त्यांना पूर्ण आठवडा काम करण्याची गरज वाटत नाही.

**3. वाढते औद्योगिकरण**

भारतात 21 व्या शतकात औद्योगिकरण वाढल्यामुळे कारखान्यात काम करण्यासाठी शेत मजुर हा कामगार बनला शेतीपेक्षा कारखान्यात काम कमी रोजगाज जास्त असतो शिवाय सावलीत काम असते. आठवडयाची सुट्टी असते यामुळे शेत मजूर कारखाना कामगार बनला.

**4. शिक्षण व्यवस्था**

आजची शिक्षण पद्धती विद्यार्थ्यांना कष्टाचे काम करण्यासाठी श्रम मुल्य रूजवत नाहीत. फक्त पुस्तकी ज्ञान देते या शिक्षण पद्धतीमुळे भारतीय तरूणांना शेतकाम करण्यात लाज वाटते तसेच आज शेतक—यास कोणी मुलगी देण्यास सहजा सहजी तयार होत नाही. सर्वत्र शेतीचे काम हलक्या प्रतीचे मानले जाते.

**5. मनोरंजनाची साधने**

आज भारतीय अर्थव्यवस्थेत इंटरनेट, स्मार्टफोन, सिनेमाहॉल या सुविधेमुळे चंगळवाद वाढला आहे. ग्रामिण भागात क्रीकेटमॅच पाहण्यात व खेळण्यात तसेच पत्ते खेळण्यात वेळ खर्च केला जातो.

**6. रेशनिंग — स्वस्त धान्य**

भारतात शेतमजुरांना स्वस्त धान्य दुकानातून मोफत व अतिशय कमी दराने गहू, तांदूळ, साखर, अशा जिवनावश्यक वस्तू मिळतात. एका रेशनकार्डावर 10 किलो धान्य स्वस्त दराने मिळते. याचा परिणाम म्हणून शेत मजूर काम करायला तयार नसतो. उदा.— अंत्यादय, अन्नपूर्णा इ.

**7 शासनाचे धोरण**

सरकारच्या वेगवेगळया धोरणांमुळे शेतमजुरांचा तुटवडा जाणवतो. जसे 10 वी, 12 वी पास झालेल्यांना बेकार पट मिळतो. दारिद्रय रेषेखाली मुला मुलींना स्कॉलरशिप मिळते. मुलींना मोफत शिक्षण प्रवासाचा पास मोफत आरोग्य तपासणी. शाळेतील मध्यान्ह भोजन रोख स्वरूपात उपस्थिती भत्ता अशा विविध योजनामुळे शेतमजुरांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारला आहे.

इंदिरा आवास योजनेमुळे शेतमजूरांना राहायला मोफत घरे मिळु लागली अशा घरात 20 रूपयात वीज कनेक्शन मिळते अशा सोयी सुविधांमुळे शेतमजूराची काम करण्याची प्रवृत्ती कमी झाली त्यामुळे त्याचा तुटवडा निर्माण झाला.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

**8 पशुधन अनुदान**

शेतमजूराच्या उदरनिर्वाहासाठी अनुदानातून गाय, म्हैस, शेळया, कोंबडया उपलब्ध झाल्या त्यांच्या पालनपोषणातुन तो उदरनिर्वाह करू लागला परिणामी शेतमजुराचा पुरवठा कमी झाला.

**9 शेतीचे काम करण्यात कमीपणा**

आज भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीत काम करणे कमी पणाचे मानले जाते आज ग्रामीण भागात शेतकरी मुलाला विवाहासाठी मुली मिळणे कठीण झाले आहे. इतका कमीपणा शेतकामास आहे या कारणामुळे काम मिळूनही शेतकाम केले जात नाही.

**10 शहरात स्थलांतर**

आजही बहुतांशी भारतीय शेती ही लहरी मौसमी पाउसावर अवलंबून आहे. त्यामुळे शेतीच्या कामाचे स्वरूप हे हंगामी असल्याने वर्षभज रोजगाजसाठी शेतमजूर शहराकडे स्थलांतरीत झाला. शहरातीज सोयी सुविधामुळे तो त्याच ठिकाणी स्थलांतरीत झाला. म्हणून त्याचा तुटवडा निर्माण झाला.

**11 रोजगार हमी योजना**

वेगवेगळया राज्यात रोजगार हमी योजने अंतर्गत कमी कष्टाची जास्त मोबदल्याची कामे शेतमजूरांना दिली जात असलेने त्यांनी शेतातील अधिक कष्टाची कमी मोबदल्याची कामे नाकारली म्हणून भारतीय शेतीला शेतमजूरांचा तुटवडा जाणवतो.

**12 राहणीमानाचा खर्च कमी झाला**

भारतीय शेतमजूरांना मोफत घरे, स्वस्त दराने अन्नधान्य, मुलांना शिक्षणासाठी स्कॉलरशिप मोफत वसतिगृह, पशुधन अनुदान इ. सर्व कारणामुळे त्याचा राहणीमानाचा खर्च खूपच कमी झाला. परिणामी त्याची काम करण्याची प्रवृत्ती कमी झाली.

**13 इतर कारणे**

एकसमान पिकपद्धती शेतमालाचा कमी दर, बांधावरची शेती, शेतमजूराची चैनीविषयी वृत्ती, छूपी बेकारी, व्यसनाधिनता, सततच्या निवडणूका इ. कारणामुळे आज भारतीय शेतक–यास शेतात काम करणेसाठी शेतमजुराची प्रचंड तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे त्याची कामे वेळेवर होत नसल्याने एकूणच भारतीय शेतीची उत्पादकता घटली आहे.

**उपाययोजना**

1 शेतमजुरांना तासानूसार मोबदला देणेत यावा.
2 रोजगार हमी योजनेतुन संबंधित शेतक–याची कामे करून दयावीत त्याबद्दलचा मोबदला संबंधित शेतक–याकडून घ्यावा.
3 बारमाही पाणी पुरवठा उपलब्ध करून बारमाही रोजगार निर्माण करावा.
4 शेतमजूरांना चांगली वागणूक दयावी.
5 शेतमजूरीच्या दरात वाढ करावी.
6 शिक्षणाचे महत्व पटवून दयावे.
7 आदर्श शेतमजूर योजना सुरू करावी.
8 प्रामाणिक शेतमजूरांना आठवडा पगारी सुट्टी दयावी.
9 प्रामाणिक शेतमजूरांना पेन्शन योजना सुरू करावी.
10 एकसारख्या पिक पद्धतीत बदल करावा.
11 सामूहिक शेतीचा प्रयोग करून शेतीचे यमिकीकरण करावे.
12 शेतमजूर संघाची स्थापना करावी.
13 शेतमालाला उत्पादन खर्च भरून निघेल इतका हमी भाव दयावा.

अशाप्रकारे भारतातील शेतमजूरांची समस्या साडविण्यासाठी वरील उपाया बरोबरच देशातील शेतकरी, शेतमजूर, समाज, केंद्रसरकार, राज्यसरकार ने समन्वयाने उपाययोजना केल्या पाहिजेत शेवटी भारतीय शेतकरी आणि शेतमजूर एकमेकांस पुरक आहेत.

**संदर्भ**

1 शेतीचे अर्थशास्त्र – गंगाधर पाटील
2 श्रमाचे अर्थशास्त्र – प्रभाकर देशमुख
3 कृषी अर्थशास्त्र – भीमराव देसाई
4 योजना –विविध अंक
5 अर्थ संवाद – विविध अंक